# राणी झाशी रेजिमेंट मधील काही महिला अधिकारी

**श्री. दिपक संभाजी माने**
संशोधक विद्यार्थी,
इतिहास अधिविभाग ,
शिवाजी विद्यापीठ
कोल्हापूर (४१६००४)

**प्रस्तावना:**

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. भारतीय स्वातंत्र्याचे अखेरचे पर्व म्हणजे १९४२च्या छोडो भारत स्वातंत्र्यलढ्यापुर्वी १ सप्टेंबर १९३९मध्ये दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात झाली आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्याला एक वेगळेच वळण लागले. या जागतिक महायुद्धामुळे भारताला सशस्त्र क्रांतीतून स्वातंत्र्य मिळू शकते असे अनेक क्रांतिकारी नेत्यांना वाटत होते.त्यामध्ये प्रामुख्याने रासबिहारी बोस सुभाष चंद्र बोस व इतर क्रांतिकारी नेत्यांचा समावेश होतो. भारताला अहिंसात्मक पद्धतीने स्वातंत्र्य मिळणार नाही. तर त्यासाठी शस्त्रे हातात घेऊन भारताला इंग्रजांच्या विरुद्ध लढावे लागेल अशी धारणा रासबिहारी बोस व सुभाष चंद्र बोस यांची झाली होती. यातूनच रासबिहारी बोस आणि सुभाष चंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली. आझाद हिंद सेनेच्या स्थापनेचे मूळ उद्दिष्टे असे होते की भारताला या पारतंत्र्यातून सोडवून भारताला स्वातंत्र्य करावयाचे आणि त्यासाठी सशस्त्र क्रांती च्या माध्यमातून हे स्वातंत्र्य मिळवायचे असे होते. यासाठी १९४२ मध्ये आझाद हिंद सेनेची स्थापना रासबिहारी बोस यांनी केली व नंतर त्याचे नेतृत्व हे सुभाष चंद्र बोस यांना दिले. या आजाद हिंद सेनेमध्ये राणी झाशीची रेजिमेंट ची स्थापना केली होती यामध्ये त्यावेळी १८५ स्त्रिया या सैनिक होत्या. या महिला सैनिक युद्धामध्ये जखमी झालेल्या सैनिकांची सेवा, तसेच रसद पुरवण्याचे काम देखील करत होत्या. लक्ष्मी स्वामीनाथन उर्फ लक्ष्मी सहगल यांच्या नेतृत्वाखाली भारतातील अनेक महिलांनी या झाशी राणी पथकामध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये प्रामुख्याने मानवती पांडे, जानकी दावर, कल्याणी अम्मा, पी नारायण कुट्टी, नीरा आर्या, शकुंतला गांधी, कुमारी बेला मुखर्जी, रमा मेहता, जी. जी कृष्णवेणी, मेमी संन्याल, लक्ष्मी सेन गुप्ता, लक्ष्मी अग्रवाल, नेऊ रॉय, अरुणा व माया गांगुली, लेफ्टनंट प्रतिमा सेन, डॉ. गौरी भट्टाचार्य, ममता चंद्रगुप्त मेहता, करुणा गांगुली, शांती व अंजली भगिनी, डॉ.लावण्य चाटोपाध्याय, सिप्री सेन, प्रतिमा पाल व इतर अनेक महिलांनी या स्वातंत्र्यलढ्यामध्ये राणी झाशीच्या रेजिमेंट मध्ये सहभाग घेतला होता.

**कळीचे शब्द:** भारतीय स्वातंत्र्यलढा, राणी झाशीची रेजिमेंट, वंचित महिला अधिकारी यांचे कार्य.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

१.भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील सर्वसामान्य वंचित घटकांच्या योगदानाची माहिती करून घेणे.

२.भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील महिला क्रांतिकारांच्या सहभागाचा आढावा घेणे.

३.आझाद हिंद सेनेमधील राणी झाशीची रेजिमेंटच्या महिला अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा घेणे

४.स्वातंत्र्य चळवळी बरोबरच त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती घेणे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम स्त्रोत साधनांवरती आधारित आहे. विविध संदर्भ ग्रंथ ,पुस्तके ,नियतकालके, समाज विज्ञान कोश ,वृत्तपत्रे, विकिपीडिया, इंटरनेट याचा वापर करण्यात आला आहे.

**कॅप्टन लक्ष्मी सहगल –**

लक्ष्मी एस स्वामीनाथन उर्फ कॅप्टन लक्ष्मी सहगल (२४ ऑक्टो.ते २३ जुलै २०१२ ) या पेशाने डॉक्टर होत्या. १९४३ मध्ये त्यांनी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेत राणी लक्ष्मीबाई रेजिमेंटच्या कॅप्टन म्हणून जबाबदारी सांभाळली. त्यांचे वडील मद्रास उच्च न्यायालयामध्ये वकिली करत होते. लक्ष्मी सहगल यांनी १९३८ मध्ये मद्रास मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस ची पदवी घेतली होती व चेन्नई येथे असलेल्या कस्तुरबा गांधी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर म्हणून काम करत होत्या. कॅप्टन लक्ष्मी या आझाद हिंद सेनेच्या झाशी राणी पथकाच्या प्रमुख होत्या.आजाद हिंद सरकार मधील त्यांनी कॅबिनेट मंत्री पद संभाळले होते. या पथकात त्या आल्या त्यावेळी १८५ स्त्री होत्या. त्यानंतर हा आकडा २००० वर पोहोचला. पिस्तूल, बंदूक, मशीन गन यासारखे शस्त्रे वापरण्याचे प्रशिक्षण स्त्रियांना दिले जाई. सुरुवातीच्या काळात स्त्रिया ह्या जखमी सैनिकांची सेवा करत असत. नंतरच्या काळात कॅप्टन लक्ष्मीबाई यांच्या विनंतीवरून सुभाष बाबू यांनी महिलांच्या दोन पथकांना युद्धाच्या आघाडीवर जाण्यास संधी दिली. हिंदुस्तान व ब्रह्मदेश यांच्या आघाडीवर झालेला युद्धात या स्त्रियांनी निकराने लढा देऊन त्या ठिकाणी विजय देखील मिळवला होता. सुभाष चंद्र बोस यांच्या मृत्यूनंतर व आझाद हिंद सेनेच्या रासानंतर कॅप्टन लक्ष्मीबाई यांच्यावर खटलांना दाखल न करता त्यांना सोडून देण्यात आले. त्यानंतर त्यांनी बांगलादेशात वैद्यकीय सुविधा आणि बचाव कार्यातील सहभाग घेतला मार्च १९४७ मध्ये लाहोरच्या प्रेमकुमार यांच्याशी त्यांनी लग्न केले विवाहानंतर त्यांनी कानपूर या ठिकाणी आपले वैद्यकीय प्रॅक्टिस चालू ठेवले. हिंदुस्थानाच्या फाळणीनंतर भारतात आलेल्या निर्वासित शरणार्थ्यांना त्यांनी मदत केली. १९७१ मध्ये त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला त्या कम्युनिस्ट पक्षातर्फे भारतीय राज्यसभेच्या सदस्या देखील होत्या भारत सरकारने त्यांना १९९८ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने देखील सन्मानित केले होते तसेच त्यांनी राष्ट्रपती पदाची निवडणूक देखील लढवली होती.

**मानवती पांडे-**

मानव ती पांडे यांचा जन्म ३० डिसेंबर १९२० रोजी "माईक तिला" या अप्पर बर्मा मधील गावात झाला. त्यांचे वडील एस पी पांडे हे पोस्टमास्टर होते. त्यांच्या या एकुलती एक कन्या होय. महाविद्यालयीन जीवनामध्ये त्यांना भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे आकर्षण निर्माण झाले व आपले देखील भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये योगदान असावे असे वाटत होते. यासाठीच त्यांनी इंडियन इंडिपेंडेंस लीग व आझाद हिंद फौजेच्या आंदोलनात स्त्रिया कोणत्या रीतीने सहभागी होता येईल याची एक योजना तयार केली होती. यासाठी त्यांनी महिलांमध्ये जागृती करून भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभागी होण्याचे आव्हान त्यांनी केले. राणी झाशीच्या रेजिमेंट मधील मुलींचे भरती करण्याचे काम त्यांच्यावर सुभाष चंद्र बोस यांनी सोपवले व ते काम त्यांनी अत्यंत चोखपणे पार पडले. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच अरुणा व माया गांगुली, नीलम मेहता, रमा मेहता, शकुंतला गांधी, जसवंत कोर, बेला मुखर्जी व इतर अनेक महिलांची भरती राणी झांसी रेजिमेंट मध्ये केली. १९४५ मध्ये हिरोशिमा व नागासाकी या दोन जपानी शहरांवरती अमेरिकेने अणुबॉम्ब हल्ला केला यातूनच दुसऱ्या महायुद्धाचे समाप्ती झाली. त्यातच सुभाष चंद्र बोस यांच्या यांच्या अपघाती निधनानंतर राणी झाशीची लक्ष्मीबाई रेजिमेंट खालसा करण्यात आली. मानवती बाईंनी पुढे सुभाष चंद्र बोस यांनी स्थापन केलेल्या फॉरवर्ड ब्लॉक या पक्षात प्रवेश केला. १९५२मध्ये त्यांनी शिक्षण क्षेत्रातील आपली पदवी व पदविका प्राप्त करून घेतली.तुम्ही मुलांची काळजी घ्या व राष्ट्र आपोआपच आपली काळजी घेईल" हे त्यांचे घोषवाक्य होते. बाल वाङ्मयाची त्यांनी हिंदी भाषेतून विपुल प्रमाणात निर्मिती केली. त्या पंचशील हा आपला धर्म मानतात. कृष्णचंद्र आर्या या स्वातंत्र्यसैनिकाशी त्यांचा विवाह झाला.

**नीरा आर्य-**

नीरा आर्य ह्या आझाद हिंद सेनेतील राणी झाशीची रेजिमेंट मधील शिपाई होत्या. यांच्यावर ब्रिटिश सरकारने गुप्तहेर असल्याचा आरोप केला होता. तिला नीरा नागिनी या नावाने देखील ओळखले जात असे. त्यांचे भाऊ वसंत कुमार हेही आजाद हिंद फौजेत होते. नीरा नागीनी आणि त्यांचा भाऊ वसंत कुमार यांच्या जीवनावर अनेक लोक गायकांनी काव्यसंग्रह आणि भजन ही दिले आहेत. त्यांच्या जीवनावर निरा नागिनी नावाचे महाकाव्य आहे. नीरा आर्य यांचा जन्म ५ मार्च १९०५ मध्ये तत्कालीन संयुक्त प्रांतातील खेकरा या शहरात झाला. त्यांचे वडील सेठ छजूमल हे एक प्रतिष्ठित व्यापारी होते. महाविद्यालयीन शिक्षण

कलकत्ता शहरात घेत असताना त्यांची ओळख ब्रिटिश भारतातील सीआयडी इन्स्पेक्टर श्रीकांत जयरंजन दास यांच्याशी झाली व त्यांच्याशी त्यांनी विवाह केला श्रीकांत जयरंजन दास हे ब्रिटिश भक्त अधिकारी होते. श्रीकांत जयरंजन दास यांना नेताजी सुभाषचंद्र बोस यांची हेरगिरी व त्यांना ठार मारण्याची जबाबदारी इंग्रजांनी दिली होती. नेताजी सुभाष चंद्र बोस यांचे प्राण वाचवण्यासाठी त्यांनी आपले पती श्रीकांत दास यांनाच ठार मारले. श्रीकांत दास यांनी नेताजींना मारण्यासाठी गोळ्या झाडल्या त्या गोळ्या नेताजींच्या ड्रायव्हरला लागल्या. त्यावेळी नीरा आर्याने श्रीकांत दास यांच्या पोटावर वार करून त्यांना जागेवरच ठार मारले. श्रीकांत दास हा निरा आर्या चा पती होता. पतीला मारल्यामुळे नेताजींनी तिला नगिना अशी पदवी दिली. आझाद हिंद फौजेची पहिली गुप्तहेर होण्याचा मान हा निरा आर्य यांना जातो. आझाद हिंद सेना शरण आल्यानंतर तिला श्रीकांत दासच्या हत्ये बद्दल काळ्यापाण्याची शिक्षा सुनावण्यात आली. स्वातंत्र्यानंतर त्यांनी फूले विकून आपला उदरनिर्वाह चालवला पण सरकारची कोणतीही मदत अथवा पेन्शन घेतली नाही.

**बेला मुखर्जी –**

बेला मुखर्जी यांचा जन्म १० ऑगस्ट १९२० रोजी कलकत्त्यामध्ये झाला. बेला मुखर्जी यांच्या वहिनी लक्ष्मी मुखर्जी ह्या राणी झाशी रेजिमेंट मध्ये होत्या. बेलाताई स्वतः सैनिक नव्हत्या पण रेजिमेंट मध्ये मुलींना भरती करून घेण्याचे काम त्या करीत असे. रंगूंच्या इंडियन इंडिपेंडेंस लीगच्या महिला विभागाच्या त्या सक्रिय सदस्य होत्या. राणी झाशीच्या रेजिमेंटमध्ये मुलींना भरती करून त्यांना राष्ट्र प्रेमाने भारीत करणे तसेच आझाद हिंद सेनेसाठी फंड जमा करणे, देणगीदार मिळवणे अशा प्रकारची कामे बेला मुखर्जी करत होत्या. लेफ्टनंट मानवती पांडे यांना अप्पर ब्रह्मदेशात पाठवल्यानंतर त्यांच्या जागेवर इंडिपेंडन्स लीग महिला विभागाच्या प्रमुखपदी बेलाताईंची नेमणूक झाली. ब्रिटिशांनी ब्रह्मदेशाचा ताबा घेतल्याबरोबर बेलाताईंना पकडून महिलांच्या तुरुंगात टाकले. त्या तुरुंगातच बेलाताईंनी दैनंदिनी लिहिण्यास सुरुवात केली या दैनंदिनीतून ब्रह्मदेशातील आझाद हिंद फौजेच्या व राणी झाशीची लक्ष्मी फलटणीची पराक्रमाचे अनेक तपशीलवार नोंदी सापडतात. ब्रिटिशांनी त्यांच्या घरावर दहाड टाकल्यानंतर त्यातील अनेक नोंदणी जाळून भस्मसात केल्या. युद्धसमाप्ती नंतर रंगूनच्या कॉलेजमध्ये त्यांनी इंग्रजी भाषेचे अध्यापन केले. अखिल ब्रह्मदेश भारतीय युवा संघटनेची स्थापना केली. त्यांना ब्रह्मदेशच्या राजकीय धोरणांमुळे भारतात यावे लागले दिल्लीत स्थायिक झाल्यानंतर त्यांनी इंग्रजी विषयाचे अध्यापक नंतर प्राध्यापक म्हणून काम करू लागल्या.

**नेऊ रॉय ( राणी भादुरी )**

नेऊ रॉय यांचा जन्म ब्रह्मदेशामध्ये १७ मार्च १९२४ मध्ये झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते. कल्पना दत्त या बंगाली क्रांतिकारी मुलीच्या चारित्र्यामुळे त्यांना राणी झाशी रेजिमेंट मध्ये भरती होण्याची स्फूर्ती मिळाली. नेबुरा यांच्या आईने आझाद हिंद सेनेसाठी सर्व दागिने दिले होते. ब्रह्मदेशामध्ये आझाद हिंद सेनेमध्ये मुलींना भरती होण्यासाठी त्या आवाहन करत होत्या. त्यांच्या या आव्हानास प्रतिसाद देऊन अनेक ख्रिस्ती व मुसलमान मुलींनी आझाद हिंद सेनेच्या राणी झाशीच्या फलटणीमध्ये सहभाग घेतला होता. नेव्ही रॉय यांना भारतीय स्वातंत्र्यलढा भारतीय संस्कृती याबद्दल विशेष असे आकर्षण होते त्यामुळेच त्यांनी आझाद हिंद सेनेमध्ये प्रवेश केला होता. झाशीच्या फलटणीच्या बरकास्तीनंतर त्यांनी काँग्रेस सेवा दल व जनज्योती समितीमध्ये काम केले. मुलींमध्ये देश प्रेमाविषयी जागृती केली.

**डॉ.गौरी भट्टाचार्य**

डॉक्टर गौरी भट्टाचार्य यांचा जन्म १४ एप्रिल १९२३मध्ये ब्रह्मदेशातील रंगून या गावी झाला. त्यांचे वडील पूर्व बंगालमधील चितगावचे स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतल्यामुळे त्यांना काही काळ चितगावामध्ये कारावास देखील झाला होता.१९४३ मध्ये त्या राणी झाशी रेजिमेंट मध्ये भरती झाल्या.नेताजींबद्दल बोलताना त्या म्हणतात की "मी आज पर्यंत असा प्रभावी नेता भारतात आगर भारताबाहेर पाहिला नाही" यावरून नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या बद्दल असणारे त्यांचे प्रेम दिसून येते. डॉक्टर गौरी भट्टाचार्य यांच्या समवेत इस्लाम ,ख्रिस्ती धर्माच्या मुली होत्या. डॉ. गौरीने या सर्व मुलींसमवेत रंगून येतील लष्करी छावण्यांमधून प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर लेफ्टनंट पदावरती त्यांची नियुक्ती झाली . पलटणी मध्ये आयोजित केलेल्या नेमबाजी स्पर्धेमध्ये त्यांनी पहिले बक्षीस पटकावले होते.राणी झाशीची रेजिमेंट मध्ये भरती झाल्यामुळे

त्यांच्या जीवनाला एक शिस्त लागली. एक सच्चा शिपाई म्हणून काम करता आले आणि देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये योगदान देता आले. याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. युद्ध संपल्यानंतर त्यांनी ढक्याच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. परंतु त्या राणी झाशीच्या फलटणीत असल्यामुळे ब्रिटिश सरकारकडून त्यांच्या शैक्षणिक मार्गामध्ये अडथळे आणले गेले. हे सर्व अडथळे पार करून गौरी भट्टाचार्य यांनी वैदकीय शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांचा विवाह श्री सेन यांच्याशी झाला. आणि त्या दिल्लीत स्थायिक झाल्या. लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेजमध्ये त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले. तसेच राम मनोहर लोहिया इस्पितळामध्ये त्या डॉक्टरकीचे प्रॅक्टिस करत होत्या.

**डॉ. लावण्य चाटोपाध्याय-**

लावण्य चाटोपाध्याय यांचा जन्म कलकत्त्यामध्ये झाला. त्यांचे पती वीरेंद्रनाथ चटोपाध्याय हे इंडियन इंडिपेंडेंस लीग मध्ये काम करत होते. आझाद हिंद सेनेमध्ये ते भरती झाले होते. त्यांच्या प्रेरणेमुळे त्या राणी झाशीच्या रेजिमेंट मध्ये भरती झाल्या. परिचारिकेच्या परीक्षेमध्ये त्या सर्वप्रथम आल्या. त्यानंतर त्या आझाद हिंद सेनेच्या इस्पितळामध्ये काम करण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी रंगूनला गेल्या. आझाद हिंद सेनेमध्ये काम करत असताना त्यांच्या पतीचे दुर्दैवाने निधन झाले. युद्ध शांतता प्रस्थापित झाल्यानंतर १९४५मध्ये त्या भारतात आल्या आणि त्यांनी मॅट्रिक परीक्षा पास केली. वैद्यकीय पदवी घेऊन पश्चिम बंगाल मेडिकल सर्विस मध्ये त्यांनी काम केले. नोकरीच्या काळात त्यांनी पश्चिम बंगालमधील ग्रामीण भागांमध्ये जनतेच्या आरोग्य विषयी सेवा केली. जनतेच्या आरोग्याच्या प्रश्नांबद्दल त्यांनी विविध उपक्रम राबवले.

**समारोप-**

१९४१ मध्ये सुभाषचंद्र बोस नजर कैदेतून भूमिगत होऊन जर्मनीला पोहोचले. तिथून रासबिहारी बोस यांच्या मदतीने आझाद हिंद सेनेची स्थापना केली. कॅप्टन मनमोहन सिंग यांनी स्थापन केलेल्या इंडियन नॅशनल आर्मीला त्यांनी संजीवनी दिली. भारतीय जनता त्यावेळी अहिंसा व सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने इंग्रजांशी प्राणपणाने लढत होती त्याचवेळी भारताबाहेर आझाद हिंद फौज भारतीय स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश फोजे बरोबर निकराने शस्त्रासहित लढत होते. पूर्व व आग्नेय आशियातील सिंगापूर मला या थायलंड ब्रह्मदेश या ठिकाणच्या सर्व भारतीय महिला यांनी राणी झाशी रेजिमेंट मध्ये सहभाग घेतला होता. नेताजींनी आझाद हिंद फौजेच्या महिला पलटनीची स्थापना करण्याचा विचार मांडला आणि यामध्ये शेकडो मुलींनी सहभाग घेतला. राणी झाशीचे रेजिमेंटचे दोन भाग होते. लढाऊ पथक व परिचारिका पथक या दोन्हीही पथकांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभाग घेतला. आझाद हिंद सेना विसर्जित झाल्यानंतर राणी झाशीची रेजिमेंट मधील अनेक महिलांनी भारतीय स्वातंत्र्यानंतर सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रामध्ये बहुमोल असे योगदान दिलेले दिसून येते. यातील काही महिला अधिकारी या प्राध्यापक होऊन शैक्षणिक क्षेत्रामध्ये तर काही महिला अधिकाऱ्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रामध्ये आपले बहुमोल असे योगदान दिले. कॅप्टन लक्ष्मीबाई यांनी भारतीय राजकारणामध्ये कम्युनिस्ट पक्षातर्फे अनेक ज्वलंत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांनी राष्ट्रपती पदाची निवडणूक देखील लढवली.

**संदर्भ ग्रंथ-**

१. डॉ.गवाणकर रोहिणी. कॅ.लक्ष्मी व राणी झाशी रेजिमेंट,साधना प्रकाशन पुणे १९९८.
२. कॅ.लक्ष्मी सहगल. मेरी जीवन यात्रा, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी प्रकाशन.
३.फडके वासंती.भारतीय स्वातंत्र लढ्यातील स्त्रिया,महेता प्रकाशन, २००८.
४. डॉ.पाटील पद्मजा.भारतीय इतिहासातील स्त्रिया,फडके प्रकाशन, २००७.
५.जाखड रामसिंह .आजाद हिंद फौज की गौरव गाथा,जाखड प्रकाशन, रोहतक, १९९६.